**शिरूर नगरपरिषद, घोडनदी जि. पुणे येथील स.नं. ११४१ ब मधील गृहनिर्माण योजनेतील घरे लाभार्थ्यांच्या नावे होण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-एमयुएन-२०१८/प्र.क्र.७३२/नवि-१८**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०८/०३/२०१९

**संदर्भ :-** १) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग क्र.एलएनडी ३४८७/३२४२/सी.आर.२८३६/ग-५, दि.१६.१२.१९८८
२) जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडील आदेश क्र.पमग-११६६-तीन, दि.०७.०४.१९८९
३) नगरपरिषद, शिरूर यांच्याकडील ठराव क्र.६ (१०९), दि.१६.११.२०१८
४) कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. जमीन ३४१३ /१४९४/प्र.क्र.पु १०८/ज-५, दि.१५.०२.२०१९

**प्रस्तावना :-**

पुणे जिल्हयातील शिरूर नगरपरिषदेच्या हद्दीतील स.नं. ११४१ ब मधील ३७,२९३ चौ.मी. इतकी शासकीय जमिन महसूल व वन विभागाने दि.१६.१२.१९८८ च्या शासन ज्ञापनान्वये शिरूर नगरपरिषदेस गृह बांधणी योजनेसाठी देण्याकरीता मंजूरी दिली. त्यानुसार नगरपरिषदेने सदर जागेची संपूर्ण किंमत जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे भरणा केली असून जागेच्या ७/१२ वर नगरपरिषदेच्या नावाची नोंद झाली आहे. नगरपरिषद, शिरूर यांनी सदर जागेवर गृहनिर्माण प्रकल्प उभारून सदर जागेची व बांधकामाची किंमत संबंधित लाभार्थ्याकडून वसूल केली आहे. त्यानुसार सदरची घरे जागेसह लाभार्थ्यांच्या नावे करण्याची मागणी असून नगरपरिषदेने दि.१६.११.२०१८ रोजी ठराव क्र.६ (१०३) अन्वये सर्वसाधारण सभेमध्ये सर्वानुमते ठराव पारीत करून सदर घरे संबंधितांच्या नावे हस्तांतरीत होतील याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचा निर्णय घेतला. तसेच महसूल व वन विभागाने त्यांच्याकडील संदर्भ क्र.४ मधील दि.१५.०२.२०१९ च्या पत्रान्वये काही अटी शर्तीवर सदर शासकीय जमिनीवर बांधण्यात आलेली घरे संबंधित लाभार्थ्यांच्या नावे हस्तांतरीत करण्यास सहमती प्रदान केली आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा / नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९२ (१) (२) मधील तरतुदीनुसार नगरपरिषदेची स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय

हस्तांतरीत करता कामा नये. अशी तरतुद असून सदर तरतुदीनुसार उपरोक्त जागा त्यावरील बांधकामासह संबंधित लाभार्थ्यांच्या नावे करण्याचा प्रस्ताव शिरूर नगरपरिषदेने दि.१०.०१.२०१९ च्या पत्रान्वये शासनास सादर केला होता. त्यावर निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

पुणे जिल्हयातील नगरपरिषद, शिरुर यांच्या नावे असलेल्या सर्व्हे नं. ११४१ ब मधील ३७,२९३ चौ.मी. इतक्या जागेमधील गृहनिर्माण योजनेतील ३७१ घरधारकांना त्यांच्या खरेदी केलेल्या आकाराच्या सदनिका, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९२ (१) (२) नुसार, खालील अटी व शर्ती वर संबंधित लाभार्थ्यांच्या नावे करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

<u>अटी / शर्ती</u>

अ) सदर जमीन हस्तांतरणानंतर संबंधित लाभार्थी भोगवटादार नं.२ म्हणून जमीन धारण करतील.

ब) सदर गृहनिर्माण योजनेतील घरे मूळ लाभार्थ्यांना मूळ अटी व शर्तीनुसार हस्तांतरित करण्याची नगरपरिषद शिरुर यांनी कार्यवाही करावी.

क) सदर गृहनिर्माण योजनेतील घरे संबंधित लाभार्थ्यांना अन्य व्यक्तीस हस्तांतरित करावयाचे असल्यास / केली असल्यास त्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांची परवानगी अनुज्ञेय नजराणा भरुन घेणे बंधनकारक राहील. तसेच १९६५ च्या अधिनियमातील तरतुदीनुसार लाभार्थ्यांने नगरपरिषदेचे मालमत्ता हस्तांतरण / नामांतरण शुल्क भरणे अनिवार्य राहील.

ड) महसूल वन विभागाच्या शासन ज्ञापन क्र.एलएनडी/३४८७/३२४२/सी.आर./२८३६/ग-५, दि.१६.१२.१९८८ तसेच जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयीन आदेश क्र.पमग-११६६/तीन, दि.०७.०४.१९८९ मधील मूळ अटी व शर्ती कायम राहतील.

ई) नगरपरिषदेस आवश्यक वाटतील, अशा इतर अटी व शर्ती हस्तांतरणाच्या करारनाम्यात नमूद करण्यात याव्यात.

**२.** सदर शासन निर्णय महसूल व वन विभागाचे पत्र क्र.जमीन ३४१३/१४९४/प्र.क्र.पु १०८/ ज-५, दि.१५.०२.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

**३.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०८१९३४५६४२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SATISH J MOGHE

Digitally signed by SATISH J MOGHE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c065ad8ea11d83b12ceafb3840d637aa784932b1cae9568b618c8
44e3cf5aed6, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=e7fde1eb36d7f614ec7f3b9970fa793e6b745bca70b672c62
d914f3466a11b44, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=SATISH J MOGHE
Date: 2019.03.08 19:37:26 +05'30'

**(स.ज.मोघे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, विधानमंडळ, मुंबई.
४) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुबई.
६) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
७) आयुक्त तथा संचालक, नगरपलिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८) जिल्हाधिकारी, पुणे
९) तहसिलदार शिरूर, जि. पुणे
१०) मुख्याधिकारी, नगरपरिषद शिरूर, जि.पुणे
११) महालेखापाल, (लेखापरीक्षा /लेखा व अनुज्ञेयता-१/२) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१२) कार्यासन अधिकारी, ज-५, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) निवड नस्ती (नवि-१८), नगर विकास विभाग